<u>वि.दि.दावा क्र. २/२०२४</u>
देवानंद वि. सागर
<u>निशाणी क्र. १० क्रमश</u> :

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री.आर.व्ही.कुळकर्णी यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**११.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

**१२.** मी या प्रकरणात निशाणी १८ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. २ व ३ ला दाखल असलेले सेवा संस्था अडसुळ यांचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर मी अध्यक्ष म्हणुन सही केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी १९ व २०** देण्यात येते.

**१३.** तसेच मी या प्रकरणात निशाणी १७ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला मी प्रतिवादीला माइया वकीलांच्या मार्फत दिनांक ०७.११.२०२३ रोजी पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर माइया वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. २ ला मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश, अकोट यांनी सत्र खटला क्रमांक ३९/२०१८ मध्ये दिनांक २७. ०६.२०२२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २२** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून प्रकरणत उलटतपासणीसाठी तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. १७.०९.२०२५.

( महेश एस. काळे )

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**